नि.फौ.ख.क्र.३६/२०२३

सरकार -वि- महेश व एक **नि.क्र.२७**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – कुनाल पुरूषोत्तम मानकर,

वय. ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी, राह. – नाकाडोंगरी, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील.**

पोलिसांनी माझे समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. माझे समक्ष कोणतीही घटना घडली नाही. परंतु मी पोलिसांनी दिलेल्या कागदपत्रांवर सह्या केल्या होत्या. आता मला अभिलेखावरील सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस **निशाणी २८** देण्यात येते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस **निशाणी २९** देण्यात येते. पोलिसांनी माझेसमक्ष कोणतीही जप्ती केली नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. सहीस **निशाणी ३०** देण्यात येते.

**साक्षदार अभियोग पक्षास मदत करीत नसल्याने अभियोग पक्षाकडून साक्षदारास उलटतपासणीच्या स्वरूपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागण्यात आली. परवानगी देण्यात आली.**

हे म्हणण खरे नाही की, दिनांक २९.१२.२०२२ रोजी पोलिसांनी मला सुचनापत्र देवुन घटनास्थळी बोलविले होते. हे म्हणण खरे नाही की, पोलिसांनी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणण खरे नाही की, पोलिसांनी माझेसमक्ष एका विना क्रमांकाचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर व विना क्रमांकाची ट्रॉली ज्यामध्ये अंदाजे १ ब्रास रेती अंदाजे किंमत ३,०२,०००/– असा मुद्येमाल जप्त केला होता. पोलिसांनी ज्यावेळी कार्यवाही केली त्यावेळी आरोपी हजर नव्हता. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणण खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. गहाणे यांनी नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. १३.०८.२०२५ | दि.१३.०८.२०२५ |